मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (१) ची स्थापना करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक मत्स्यआ-२०२६/प्र.क्र.१०९/पदुम-१२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १/०७/२०२६

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २०१४/प्र.क्र.२६/१२ दिनांक ३१/०१/२०१४.
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यआ २०१४/प्र.क्र.९६/पदुम-१२ दिनांक २९/०४/२०१४.
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र.मत्स्यआ-२०२१/प्र.क्र.१४८/पदुम-१२, दिनांक १७.१२.२०२५

**<u>प्रस्तावना :-</u>**

सदर संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ मधील अतिरिक्त आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक)(योजना), सह आयुक्त मत्स्यव्यवसाय, प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, उपआयुक्त (अर्थ व नियोजन), उपआयुक्त (प्रशासन), सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय तसेच गट-ब मधील मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी व प्रशासकीय अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (१) ची संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळ (१) मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

मत्स्यव्यवसाय विभागातील गट-अ मधील अतिरिक्त आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक)(योजना), सह आयुक्त मत्स्यव्यवसाय, प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, उपआयुक्त (अर्थ व नियोजन), उपआयुक्त (प्रशासन), सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय तसेच गट-ब मधील मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी व प्रशासकीय अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियमातील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळ (१) ची स्थापना करण्यात येत आहे.

नागरी सेवा मंडळ (१)

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव (पदुम) | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव (कृषि) | सदस्य |
| ३ | आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई | सदस्य |

नागरी सेवा मंडळ (१) सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अस्तित्वात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०११२३५३६६९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.01 12:36:22 +05'30'

**( कि.म.जकाते )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सह/ उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
४) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई
६) निवडनस्ती.